**पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,**
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००
**E.mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in**

**प्रेसनोट** दिनांक : ०९/०८/२०२३

# हातभट्टी निर्मूलनासाठी आता महिला पोलीसांची पथके

जिल्ह्यातील अवैध दारू विक्री उत्पादनाची ठिकाणे उध्वस्त करण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलीसांनी मागील काही महिन्यांपासून व्यापक शोध मोहीम हाती घेतली आहे.

सदर कारवाईदरम्यान पोलीसांनी जिल्ह्यात दुर्गम ठिकाणी चालणा-या अवैध हातभट्टी व्यवसायांची ठिकाणे उध्वस्त केली आहेत. त्याचप्रमाणे अशा हातभट्ट्यांना कच्चामाल पुरवणा-या पुरवठादारांवर देखील मोठ्या कारवाया केल्या आहेत.

ग्रामीण भागातील हातभट्ट्यांची अशी ठिकाणे व अवैध दारूची विक्री ठिकाणे नेस्तनाबूत करण्यासाठी आता नाशिक ग्रामीण घटकातील महिला अंमलदार पुढे सरसावल्या आहेत. आज क्रांती दिनाचे औचित्य साधून महिला पोलीसांची चार पथके कु-हाडी व लोखंडी पहारी घेऊन कारवाईसाठी रवाना झाले आहेत. प्रत्येक पथकात ८ महिलांचा समावेश करण्यात आला असून अपर पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी कांगणे पथकांचे कामगिरीवर देखरेख करत आहेत.

आज रोजी सदर पथकांनी नाशिक ग्रामीण हद्दीतील त्रंबकेश्वर, घोटी, वाडीव-हे व वणी या ठिकाणी जाऊन अवैध हातभट्टी ठिकाणांचा कसून शोध घेतला. सदर कारवाईदरम्यान घोटी पोलीस ठाणे हद्दीतील खेडभैरव देवाचीवाडी या गावी कारवाई करत हातभट्टीचा अड्डा उध्वस्त केला असून यात ५१,०००/- रुपये किमतीची हातभट्टीची दारू व रसायन जप्त करण्यात आले असून संबंधीतांविरुद्ध घोटी पोलीस ठाणेस कलम ६५(फ) दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महिला पोलीसांच्या सदर कारवाईस जिल्ह्यातील पोलीस पाटील व नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन पोलीस अधीक्षक श्री शहाजी उमाप यांनी केले आहे.